पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

सातारा २ पुढारी शनिवार १३ फेब्रुवारी २०१६

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव



काजल बर्गेचा सत्कार करताना किशोर बर्गे, शेजारी दिलीपराव बर्गे, रामचंद्र बोतालजी व इतर.

# काजलच्या यशाने कोरेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा : बर्गे

**सातारा : प्रतिनिधी**

काजल बर्गे राज्यस्तरीय तायक्कांदो कराटे स्पर्धेत मिळवलेले यश प्रेरणादायी असून तिने कोरेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, असे गौरवोद्गार कोरेगाव शहर विकास मंचचे अध्यक्ष व तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक किशोर बर्गे यांनी काढले.

कोरेगाव येथील डी.पी. भोसले कॉलेजची विद्यार्थिनी काजल विजय बर्गे हिने महाराष्ट्र शासनाच्यावतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मार्शल आर्ट क्रीडा स्पर्धेत तायक्वांदो कराटे प्रकारात राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

काजलच्या कर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करून किशोर बर्गे यांनी कोरेगावमधील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवावा. त्यांना शहर विकास मंचच्यावतीने प्रोत्साहन दिले जाईल, असे सांगितले.

काजल बर्गे हिने प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत व प्रा. बी.डी. भोसले यांच्या मार्गदर्शनामुळे व आई-वडिलांच्या प्रेरणेमुळे यश मिळाल्याचे आवर्जुन सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, प्रा. अरूण बर्गे, मंचचे कार्याध्यक्ष दिलीपराव बर्गे, रामचंद्र बोतालजी, विठ्ठलराव काटे, पोपटराव बर्गे, आनंदराव बर्गे आदी उपस्थित होते.

सकाळ
शनिवार
२० फेब्रुवारी २०१६

## काजल बर्गे राज्यात द्वितीय



काजल बर्गे

सातारा, ता. १९ : राज्य शासनातर्फे झालेल्या राज्यस्तरीय मार्शल आर्ट क्रीडा स्पर्धेत कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या काजल बर्गे हिने तायक्वांदो कराटे प्रकारात दुसरा क्रमांक मिळविला. तिचा प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, प्राचार्य अरुण बर्गे, किशोर बर्गे आदींनी सत्कार केला.